# Regional Marathi Text Bulletin, Chatrapati Sambhajinagar

## Date: 13 February 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १३ फेब्रुवारी २०२४ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दोन दिवसांच्या संयुक्त अरब अमिरातीच्या दौऱ्यासाठी रवाना झाले. या दौऱ्यात ते संयुक्त अरब अमिरातीचे राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नहयान यांची भेट घेतील. या भेटीत द्विपक्षीय संबंध अधिक वृद्धिंगत आणि सक्षम करण्याबाबत चर्चा होणार असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं सांगितलं. या दौऱ्यात ते युएईचे उपराष्ट्रपती, पंतप्रधान तसंच संरक्षण मंत्र्यांचीही भेट घेणार आहेत. दुबई इथं होणाऱ्या विश्व शासन परिषद २०२४ मध्येही ते पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून परिषदेला संबोधित करणार आहे. अबू धाबी इथल्या पहिल्या हिंदू मंदिराचंही त्यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. उद्या पंतप्रधान कतारची राजधानी दोहा इथं जाणार आहेत. कतारचे आमिर शेख तमिम बिन हमाद आणि अन्य वरिष्ठ पदाधिकाऱ्यांसह ते द्विपक्षीय संबंधांबाबत चर्चा करतील.

****

माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी आज भारतीय जनता पक्षात प्रवेश करत असल्याचं सांगितलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. राजकीय आयुष्याची आपण नवीन सुरुवात करत असल्याचं ते म्हणाले. भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपत प्रवेश करत असल्याचं त्यांनी सांगितलं. मी सोबत कुठल्याही आमदारांना बोलावलं नसल्याचं चव्हाण यांनी यावेळी स्पष्ट केलं. त्यांनी काल आमदारकीचा आणि काँग्रेस पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता.

****

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्ह अधिकृतरित्या अजित पवार गटाला देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला शरद पवार गटानं सर्वोच्च न्यायालयात आव्हान

दिलं आहे. अजित पवार गटानं याआधीच यासंदर्भात न्यायालयात कॅव्हेट दाखल केलं आहे.

****

जागतिक रेडिओ दिन आज साजरा होत आहे. यानिमित्त आकाशवाणीच्या प्रधान महासंचालक वसुधा गुप्ता यांनी आज सकाळी दिलेल्या संदेशात, देशाच्या कानाकोपर्यात पोहोचलेलं आकाशवाणी हे अद्वितीय आणि सशक्त माध्यम असल्याचं नमूद केलं. अनेक प्रसार माध्यमांच्या सध्याच्या युगातही आकाशवाणीच्या कार्यक्रमांचं आणि बातम्यांचं महत्व आजही अबाधित आहे, असं त्या म्हणाल्या. ज्ञान, माहिती आणि मनोरंजन देणारं शतक अशी यंदाच्या रेडियो दिनाची संकल्पना आहे.

****

आरोग्य विभागातल्या ‘क’ आणि ‘ड’ संवर्ग तसंच वैद्यकीय अधिकारी गट ‘अ’ पद भरतीची प्रक्रिया सध्या सुरू असून, ठरवून दिलेल्या नियमानुसारच ही भरती करावी, यात कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी दिले आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यातल्या जनतेला पुरवल्या जाणाऱ्या विविध आरोग्य सेवांचा तसंच विभागातल्या पद भरती प्रक्रियेच्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते.

****

शिवजयंतीनिमित्त राज्य शासनाच्या वतीने आयोजित स्वराज्य सप्ताहाचा शुभारंभ काल मुंबईत गेटवे ऑफ इंडिया इथं उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झाला. यानिमित्त सुरु झालेल्या स्वराज्य यात्रेची सुरुवात शिवज्योत आणि पताका देऊन करण्यात आली. महाराजांच्या विचारांवर निष्ठा ठेवून काम करण्याचा संकल्प करुया, आपल्या महाराष्ट्राला महान राष्ट्र बनवण्यासाठी एकजूटीने काम करुया असं आवाहन पवार यांनी यावेळी केलं.

****

छत्रपती शिवाजी महराज जयंतीनिमित्त बीड इथं शिवप्रेमी शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचार्यांच्या वतीने दोन दिवसीय शिवप्रेमी शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यात महाराजांनी लढाईत वापरलेल्या शस्त्रांचं प्रदर्शन, तसंच कान्होजी आंग्रे यांचे वंशज रघुजीराजे आंग्रे यांचं व्याख्यान होणार आहे. शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष राजेश मोराळे यांनी ही माहिती दिली.

****

विकसित भारत संकल्प यात्रेचं आज छत्रपती संभाजीनगरमध्ये राधास्वामी कॉलनी, हर्सूल तलाव परिसरात आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी नागरिकांना विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली, तसंच नागरिकांनी विकसित भारताची प्रतिज्ञा घेतली.

****

मराठवाडा साहित्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार आज प्रसिद्ध लेखक रा.रं.बोराडे यांना प्रदान करण्यात आला. बोराडे यांच्या छत्रपती संभाजीनगर इथल्या निवासस्थानी मसापचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठालेपाटील यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं. २५ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र, शाल आणि श्रीफळ असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

****

विविध विभागातल्या प्रलंबित संचिका निकाली काढण्यासाठी नांदेड जिल्हा परिषदेत ई- फाईल ट्रॅगिंक सिस्टिमची सुरवात करण्यात आली आहे. प्रायोगिक तत्वावर या प्रणालीद्वारे शिक्षण आणि आरोग्य विभाग ऑनलाईन करण्यता आला आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी ही माहिती दिली.

****